नि.फौ.ख. क्रमांक.२३३/२०२०
सरकार विरुध्द पांडुरंग
निशाणी क्रमांक – ८८.

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०८**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव –दत्तु रामचंद्र करणवाड,
वय -७४ वर्षे, धंदा -मजूरी,
रा. चिखली, ता.अहमदपूर जि.लातूर.

<u>**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन.काकडे**</u>

**०१.** दि.०५/१०/२०२० रोजी झालेल्या घटनेबाबत मला कोणतीही माहिती नाही. पोलिसांनी माझे टिपन्न नोंदविले नव्हते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, मी व गावातील इतर लोकांनी वाळूच्या टिप्परमुळे गावातील रस्ता खराब होत असल्याची तक्रार तहसीलदार, अहमदपूर यांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी एम.एच.२५,यु.१८९९ हा टिप्पर गावात आला. हे म्हणणे खरे नाही की, हा टिप्पर आम्ही अडविला व त्याची माहिती तहसीलदार साहेबांना कळवली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो टिप्पर पकडून पोलीस ठाण्यात लावला. हे म्हणणे खरे नाही की, मला समजले की, तो टिप्पर पोलीस ठाण्यातून चोरी गेला. हे म्हणणे खरे नाही की, तो टिप्पर आरोपीने चोरल्याचे मला समजले. हे म्हणणे खरे नाही की, आता मला माझे जबाबातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखवला, त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, खोटी साक्ष देत आहेत.

सरतपास पुर्ण.

<u>**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.जी.मुंडे यांच्यामार्फत सुरु:-**</u>

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -२०.०२.२०२६